# MT - 162

**Seat No.** | | | | | | | |

2019 ___ ___ 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM - I - PAPER - II**

**Time : 3 Hours** **(Pages 10)** **Marks : 100**

कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.

(४) विभाग ५ - उपयोजित लेखन प्र. ५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. १ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग – १ : गद्य

### पठित गद्य

**प्र.१ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** १

लेखकाच्या उपोषणाविषयी कानांवर येणारी वाक्ये

→ [ ] → [ ]

**(ii) एका वाक्यात उत्तर लिहा.** १

पंतांच्या धर्मपत्नीचा कशावर अजिबात विश्वास नव्हता ?

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येताजाता ही माझी 'नाही ती भानगड, आहे, उगीच 'हात दाखवून अवलक्षण, आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं!' अशी, वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली; पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो. 'एकशे एक्क्याऐंशी पौंड'. रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे, या विचाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर

वजन उतरते या विचाराने मला त्याचेही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता. "घोरत तर असता रात्रभर!" अशासारखी दुरुत्तरे ती मला करत असे.

''दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!" अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज" मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ - सोकाजी त्रिलोकेकर.

(२) (i) **कोण कोणास म्हणाले ते लिहा.** १




(ii) **चूक की बरोबर ते लिहा.** १

चाळीतल्या लोकांनी पंतांच्या उपासाची अवहेलना केली.

(३) **व्याकरण :**

(i) **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांतील अव्यय ओळखून प्रकार लिहा.** १

अशी वाक्ये माझ्या <u>कानांवर</u> येऊ लागली.

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

(अ) दु:ख - [ ] (आ) अविश्वास - [ ]

(४) **स्वमत :** २

पंतांनी भीष्मप्रतिज्ञा करण्यामागचा हेतू लिहा.

**प्र.१ (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** १

निरंजनने क्षणभर विचार केला आणि .............

(अ) स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. (ब) घटनास्थळी पोहचला.

(क) गाववाल्यांना बोलवायला गेला. (ड) शाळेत निघून गेला.

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** १

............किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती.

(पाच-सहा, दोन-तीन, तीन-चार, सहा-सात)

निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास. भडसावळे गुरुजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनला शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावताच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रूळांबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जवं केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या. एवढं बोलल्यावर स्टेशनमास्तरांनाही त्याच्या बोलण्यात तथ्य वाटू लागलं. उगाच धोका नको म्हणून गाडी थांबवायला सांगून ते पुलाकडे निघाले. निरंजनने नेमकी जागा दाखवली. फारच भयंकर ! कल्पना करता येणार नाही, असा भयंकर अपघात झाला असता. स्टेशनमास्तरांनी लगेचच गाडी दीर्घकाळ थांबवण्याचा आदेश दिला आणि ते या घटनेचा पंचनामा करायला लागले.

**(२) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** १

**धाड्धाड् आवाज करणारी रेल्वेगाडी डोळ्यांसमोर दिसल्याने निरंजन विसरला**

↓ [ ] ↓ [ ]

**(ii) एका वाक्यात उत्तर लिहा** १

निरंजनने कोणते आर्जवं केले ?

**(३) व्याकरण**

**तक्ता पूर्ण करा.** २

| अ.क्र | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती प्रकार |
|---|---|---|---|
| (i) | मिनिटांत | - - - - - | - - - - - |
| (ii) | पोलिसांच्या | - - - - - | - - - - - |

**(४) स्वमत** २

'भावनेपेक्षा कृती श्रेष्ठ' या विचारांवर स्वमत प्रकट करा.

## अपठित गद्य

**प्र.१ (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) २




विद्वत्ता कोणाकडेही असो ती क्षणात मिळवता येणारी बाब नाही. ज्याप्रमाणे झाडाची मुळे एकदम खोल-खोल जाऊ शकत नाहीत, त्यासाठी महिने-वर्षे लागतात; परंतु जेवढी खोल मुळे असतात, तेवढा त्या झाडाचा पाया भक्कम असतो. तसेच विद्वत्तेचेही आहे. जेवढ्या प्रयत्नाने ती मिळवाल तेवढे प्रभावी तुमचे व्यक्तिमत्त्व असेल. आपल्याला एकदाच विजेसारखे चमकायचे, की सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित राहायचे, हे ठरवायचे आहे. विद्वत्ता ही अशी बाब आहे, जी केवळ वेळेच्या सदुपयोगाने मिळते. बरे, तिला कोणी तुमच्याकडून काढून किंवा चोरून घेऊ शकत नाही. ती मिळवण्यात खूप धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही; पण एकदा ती तुमच्याजवळ आली, की संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशात दिपून जाते. आपला कोणी सन्मान करावा अशी भावनाच मनातून निघून जाते, सर्वजण तुमच्या सहवासात येण्यासाठी, तुमचे आदरातिथ्य करण्यासाठी आतुर असतात. थोडक्यात, विद्वत्ता तुम्हांला सर्व मिळवून देते, ज्याची तुम्ही स्वप्नातही अपेक्षा केलेली नसते.

**(२) खालील घटनेचा किंवा कृतीचा परिणाम लिहा.** २

| अ.क्र | घटना/कृती | परिणाम |
|---|---|---|
| (i) | झाडाची मुळे खोल जाणे | - - - - - |
| (ii) | प्रयत्नांनी विद्या मिळवणे | - - - - - |

**(३) व्याकरण**

**खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** २

(i) संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशाने दिपून जाईल.

(ii) एकदाच विजेसारखे चमकायचे, की सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित राहायचे ?

**(४) स्वमत** २

व्यक्तीला विद्या प्राप्त झाल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी मिळू शकतात ते स्पष्ट करा.

## विभाग – २ : पद्य

**प्र.२ (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** १




**(ii) खाली दिलेल्या अर्थाची ओळ कवितेतून शोधून लिहा.** १

कष्ट करणाऱ्यांना मदत करू -

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेवू सृष्टी...
धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे
उधळू, फेकू बिया डोंगरी, रूजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे
डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी ?
रंग मजेचे, रंग उद्याचे
मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे
हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे

**(२) (i) चौकट पूर्ण करा.** १

जिथे दृष्टी पोचते तेथे असतात - [ ]

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** १

आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी ........... (दृष्टी, तुष्टी, वृष्टी, पुष्टी)

(३) **पुढील काव्यपंक्तिचा अर्थ स्पष्ट करा.** २

डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी ?
रंग मजेचे, रंग उद्याचे

(४) **वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी उपाय सुचवा.** २

**प्र.२ (आ) 'हिरवंगार झाडासारखं' व 'दोन दिवस' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.**

(१) **कवी/कवयित्री : –** १

(२) **कवितेचा रचनाप्रकार : –** १

(३) **कवितेचा काव्यसंग्रह : –** १

(४) **कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –** १

(५) **कवितेतील आवडलेली ओळ : –** २

(६) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –** २

**प्र.२ (इ) खालील ओळींचे रसग्रहण करा.** ४

सवेचिं झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
भुकेलें वत्सरावें। धेनु हुंबरत धांवे ।।

**विभाग – ३ : स्थूलवाचन**

**प्र.३ खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

(१) **व्युत्पत्ती कोशाचे कार्य.**

(२) **'आधी केले मग सांगितले', या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.**

(३) **सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.**

## विभाग – ४ : भाषाभ्यास

प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.

(१) समास २

खालील तक्ता पूर्ण करा.

| अ.क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | दीडदोन | - - - - - | - - - - - |
| (ii) | जागोजागी | - - - - - | - - - - - |

(२) अलंकार २

खालील उदाहरण वाचून कृती करा.

मुंबईची 'घरे' मात्र लहान ! कबुतराच्या खुराड्यांसारखी !

| उपमेय | उपमान | साम्यवाचक | समान धर्म (गुण) |
|---|---|---|---|
| - - - - - | - - - - - | - - - - - | - - - - - |

(३) वाक्यरूपांतर २

कंसातील सूचनेनुसार कृती.

(i) प्रवासात भरभरून बोलावे. (आज्ञार्थी करा.)

(ii) पांढरा रंग कोणाला आवडत नाही ? (विधानार्थी करा.)

(४) सामान्यरूप २

खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा.

| अ.क्र | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| (i) | दसऱ्याचा | - - - - - | - - - - - |
| (ii) | बागेत | - - - - - | - - - - - |

(५) वाक्प्रचार २

कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.

(दुरुत्तरे करणे, बेतात असणे, अवहेलना करणे)

(i) ज्यांनी माझ्या उपासाचा अपमान केला होता, त्यांनीच मला डाएटचा सल्ला दिला.

(ii) आजकालची मुले मोठ्या माणसांना सतत उलट उत्तरे करताना दिसतात.

प्र.४ (आ) भाषासौंदर्य

(१) (i) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** १

(अ) जगाच्या विनाशाची अवस्था - [ ]

(आ) महिन्याने प्रसिध्द होणारे - [ ]

(ii) **खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

(अ) अलिकडे - [ ] (आ) विरोध - [ ]

(iii) **पुढील शब्दांचे दोन भिन्न अर्थ लिहा.** १

[ ] ← व्रत → [ ]

(iv) **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. ('जडण व घडण' हे शब्द सोडून)** १

जडणघडण -

(२) **लेखननियमानुसार लेखन -**

(i) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** १

आकाश मेघरहीत निळ्या नितळायीने नटले होते.

(ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.** १

(अ) जिवन, जीवण, जिवाण, जीवन -

(आ) नीरीक्षण, निरिक्षण, नीररक्षण, निरीक्षण -

(३) **विरामचिन्हे** २

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) कित्ती सुंदर आता ही ताई कोण बरं

(ii) वा सर्व ताई दादांनी मला कित्ती माहिती दिली आता हा कोणता दादा बरं.

(४) **पारिभाषिक शब्द -**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** १

(i) Tax - (ii) Unit -

(५) **भाषिक खेळ -** १

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**

करवंद, जांभळ, अननस, द्राक्ष

**विभाग – ५ : उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) (१) पत्रलेखन**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.** ५

**अभिनंदन! अभिनंदन! अभिनंदन!**

कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाड

यांच्या तर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेत इयत्ता-आठवी 'ब' मधील विद्यार्थिनी

कु. सानिका देशमुख हिला जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त.

मुख्याध्यापक

शारदा विद्यालय, आंबिवली.

**(२) सारांश लेखन** ५

**विभाग - १ गद्य विभागातील प्र. १ इ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५ (आ) खालील कृती सोडवा.**

**(१) बातमी लेखन** ६

डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा.

वरील विषय वाचून त्यावर बातमी तयार करा.

**(२) कथालेखन (८० ते १००)** ६

**खालील शब्द गुंफून एक छानशी कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**

सिंह – उंदीर – शिकारी – जाळे

**प्र.५ (इ) लेखनकौशल्य** ८

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.(शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

**(१) प्रसंगलेखन**

मी अनुभवलेला व पाहिलेला अब्दुलचा सत्कार समारंभ.




वरील सत्कार समारंभाप्रसंगी तुम्ही उपस्थित होता. त्या भावपूर्ण प्रसंगाचे वर्णन करा.

(२) **आत्मकथन**

**फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत**

१. निर्मिती
२. त्यावेळी भोगाव्या लागणाऱ्या यातना
३. निर्मितीचा आनंद
४. निर्मितीनंतरचा प्रवास
५. आजची स्थिती - अपेक्षा - शेवट



**Best Of Luck**